# परिशिष्ट

# परिशिष्ट

1. लेखकाचे छायाचित्र व अल्प परिचय
2. लेखकाच्या साहित्याचा परिचय.
3. लेखकाचे हस्ताक्षर.
4. अप्रकाशित कादंबरीची लेखकाच्या हस्ताक्षरातील सापडलेली काही पाने.
5. प्रकाशित "लखू" कादंबरीचा नायक "लखू" चे सध्याचे छायाचित्र.
6. मूलाखत व छायाचित्र.

# परिशिष्ट

लेखक शंकर भाऊ साठे यांचे तरूणपणातील छायाचित्र व त्यांचा अल्पपरिचय.



1. संपूर्ण नांव : शंकर भाऊ साठे
2. जन्मगांव : वाटेगाव, ता.वाळवा, जि.सांगली.
3. जन्मतारीख : दि.26 ऑक्टोंबर 1925.
4. शिक्षण : फक्त पंधरा दिवस.
5. प्रकाशित साहित्य

आत्मकथनात्मक चरित्र – "माझा भाऊ अण्णा भाऊ"

कादंबऱ्या


| | | |
|---|---|---|
| 1) एकच काडतूस | 5) जग | 9) सगुणा |
| 2) बायडी | 6) सुगंधा | 10) बाजी |
| 3) लखू | 7) सूड | 11) घमांडी |
| 4) सावळा | 8) हंबीरा | 12) काळा ओढा |


6. <u>अप्रकाशित साहित्य</u> – तीन अप्रकाशित कादंबऱ्या.

7. <u>इतर वैयक्तिक माहिती</u> –

* भारत देशाच्या स्वातंत्र्याच्या 1942 सालच्या लढयात सहभाग.
* क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सोबत कार्य.
* संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सक्रिय सहभाग.
* भारतीय कम्युनिस्ट पक्ष, कॉंग्रेस पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, रिपब्लीकन पक्ष या राष्ट्रीय पक्षांत कार्यकर्ते म्हणून आयुष्यभर कार्य केले.
* "लाल बावटा" कलापथक आणि "अण्णा भाऊ साठे कलापथक" या कलापथकातून "शाहीर" आणि "कलाकार" म्हणून शंकर भाऊंनी महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश या राज्यांबरोबरच भारत देशाच्या एक तृतियांश भागात जनजागृती व समाजपरिवर्तनासाठी भ्रमंती केली.
* अण्णा भाऊ साठे लिखित "फकिरा" या मराठी भाषेतील चित्रपटात शंकर भाऊ साठे यांनी "फकिराच्या एका दरोडेखोर साथीदाराची भूमिका" केली होती.
* शंकर भाऊ साठे यांचा मृत्यू – दि.15 मार्च 1996.

लेखकाचे हस्ताक्षर




लेखक शंकर भाऊ साठे यांनी घाटकोपर मुंबई येथून "वाटेगाव" या गावी असलेला त्यांचा मुलगा चि.संजय यास दि.10 डिसेंबर 1990 रोजी लिहिलेले पत्र.

लेखक शंकर भाऊ साठे यांची अप्रकाशित असलेल्या "शामगांव" या कादंबरीची लेखकाच्या हस्ताक्षरातील काही पाने

शामगांव या कादंबरीची पात्रे.
दौलती दादाजी ओसले.) आजोबा कुकाजी ) दोन मुलगे
दौलती व सखाजी.)
चंद्रु महादेव शिंदे.) आजोबा पांडुरंग वडुरे)

बळीराम केशव थोरात - केशवचे ~~कोणि~~ तीन मुलगे.
बळीराम व. आत्माराम - शांताराम
बळीची पत्नी - कलाबाई -) आत्माची पत्नी - तानुबाई -
बळीचा मुलगा हैबती - आत्माचा मुलगा महीपती
शांतारामची पत्नी बाळाबाई - तिला दोन मुली -
चंद्रु महादेव शिंदे. व श्रीपती महादेव शिंदे हे दोघे
भाऊ होते.

फत्तेपुर ) सरिता - श्रीपतीची वडील मुलगी

शामगांव

दौलती नारोजी शिंदे - त्यांचा आजोबा कुबाजी कुळ पोलीस
पाटील. नंतरच्या कुलकर्णी पाटील.
(नारोजींचे दोन मुलगे दौलती - श्रीपती.)

चंद्रे महादेव ~~भोसले~~. त्याचा आजोबा पांडुरंग वडवडे.
महादेवचे दोन मुलगे चंद्रे व महीपती - हे मुळचे कुलकर्णी
पाटील नंतरचे पोलीस पाटील.) त्याचप्रमाणे गांवातील इतर
आडनांव भोसले - शिंदे या दोन गावच्या मोठ्या होत्या
त्यांच्यात पाटीलकी वरील थोडे काम होत असे. इतर
चालक ढोबळे, सालवणकर, चव्हाण, मोरे, साळुंके
आणी अनेक आडनावाच्या व्यक्ती होत्या.

सा.ध. प.ग.ध.
सारे गा.म.ध.(सा)

२

कोणी तरी पण कारण गावात काही लोकांची भाऊकी लागत
होता गावात त्याला ब्राह्मण समजून कोणत्याही कामात
त्याला लोक मान देत होते. आणि जर गावात पोलिस प
पाटील आली तर महादेव त्याच्याशी असेपर्यंत दूध पाजीत होता
आणि पाटील आपले सरकारी काम पाहून मोकळे होई पटील
त्याला नेहमी काकडीचे जेवण देत होता त्यामुळे सर्व
पोलिस यायचे महादेव शिंदे याला त्यांचा सल्ला होता त्या
मुळे कोणीही त्याची ओळख ठेवली होती. त्याला कोणीही
काही अधिकारी होता असे धरून त्याला मुलखी पाटील म्हणून
कुणी [illegible] पोलिस पाटील असे म्हणत असे हे ऐकून बसला होता
परंतु हे असले आपल्याला काहीच नव्हते कारण असले
आपल्याला कोणी हाटीवर असले माहीत हा गावातच आविष्कार
गावातल्या बाहेर होता त्याला त्यावेळी काम काय काही
फुकट काळत नव्हते कुणाचा मुलगा वाटी हो माहीत
पाहिजे होता आणि मी पोलिस पाटील आहे असे समजून
तो मिरवित होता परंतु त्याला आपली पाटीलकी तोतयी
आहे आपण आता मुलखी पाटील आहोत याचा त्याला
कांही पत्ता नव्हता आणि त्याच्या मुलांना दोघांनी ही सुद्धा
हिम्मत केली धाडसी होता त्याला नंतर कळाले की

२

तळकाढून टाकीत होते. जसे आपण आपल्या लहान मुलांना
सांभाळतो त्यांची उपासना करतो तसे ते पक्ष्याला सांभाळीत
होते. इथल्या घरात दोन-तीन भावकी मोठ्या होत्या. ओसले.
शिंदे आणि हिंगणे.— चंद्रू आबाजी शिंदे यांच्याकडे गावची
पोलीस पाटीलकी होती. आणि दौलती कृष्णा ओसले यांच्या
कडे कुलकर्णी पाटीलकी होती. त्यामुळं त्या दोन आळीत पहिल्या
पासून वैराचे निखारे फुलत होते या दोन आळीत कधी कोणी
फुटेल याचा नेम नव्हता. दौलती ओसले हा स्वाभिमानी
डंख लावून तो मराय आणि मारायला तयार होता. आणि
तसाच तो चंद्रू पाटलांचा होता तो रोज सकाळ
वडा पाच माणसं बैठकीला घेऊन बसत होता. दोघांही
आळीला पाच पंचवीस तरणी कांई पोरं होती त्यांना स्वतः
च्या मरणाची काळजी नव्हती ती बेपर्वा होती आणि चंद्रू
कृष्णा पाटील त्यांना जो काही पाहिजे ते पुरवीत होता
दौलती ओसले पाटलानं तरणी कांई दहा पोरं त्यांना दूध
खुराक चारून त्यांना सांभाळली होती आणि ही दोघांही
कुठं वैलो सारखी एक मेकावर कोयतन होती परंतु
कोणी कोणाला नमत नव्हते. मरण होणार तरी येत
त्याला भ्यायचं कारण आहे ते दोघंही हे काहीतरी बोलत होते


४ श्रामि गांव

आणि कोणीही कधीही बोलणार नाही हे दोन पाटील व पाहुणे देत होते. त्यातीलपैकी कोणी लागून कोणी दुसऱ्या गावात ... भार हे दोन पाटील होते तसेच असले आळीच्या बळीराम हा मानाचा कष्टाळू होता. त्याला तीन मुलगे होते. पहिला चिंटू, दुसरा मंटू आणि तिसरा संटू या तिन्हीही मुलां साठी बळीरामने प्रत्येकी पाच पाच एकर जमिन व तीघांना तीघांचे नावे एक घर बांधून ठेवले होते आणि सर्वात मोठे वेळी त्याने जी जमिन होती ती चिंटू, मंटू, संटू यांना समान वाटून देऊन तो त्यांच्या नावे करून मोकळा झाला होता. पुढे हे तीघे भाऊ आपापल्या जमिनी करून पिकवून प्रपंच करू लागले. कोणी कोणाशी भांडण तंटा काही करीत नव्हते कारण बळीने त्या तीघात भांडणाचे मूळ असे काहीच ठेवले नव्हते त्यो मूळ भांडणाचा काही प्रश्नच येत नव्हता. परंतु मंटू आणि संटू या दोघांच्या बायका मात्र भांडखोर होत्या. त्यांना कोणी जरी दारात गेले तर त्या दोघींना सहन होत नव्हते त्या साठी चिंटूच्या पत्नी सतीत्यांची भांडणे होत होती – तेव्हा एके दिवशी चिंटूच्या पत्नीने चिंटूला सांगितले – ऐकलत का? काय सांगतेय त्या? नव्हे आपली काही त्या बाळींच्या ... दारात तो ... त्यांच्या

व्हायचं तो मांगांग बोलल्यात पुन्हा विचारल्या वरही बावडे. परंतु
धरून देवळात ठेवलं बाद बाराव साधून विचारलं. हे पण
सांगू तो मागण चोरली होयस तर बाई सांगतु लीळेचा आणि
त्या दोघी होयत्या गु. रवात्यांची कोंबड्या कुठं तच्यो नाडाला
लागला वस्तीला बघू कधातरी. चिडून सांगितलं. गु. रवाल्या
कोंबड्या म्हणताय मग त्यांनी शिव्या देवायच पुन्हा बोलतायत
सांगा साधून विचारलं. आगं ती आताच धान होय त्यांनी हार
होस्थं आस्ता तर त्या तशा वागल्याच नसत्या म्हणून तु आपली
गप्प बस. चिडून सांगितलं. हे बघा मी गप्प होते तवर गप्प
होते तर का. माझा होस्थ फिरलं तर त्या दोघींची पण लुगडी
फाडून टाकीन मग त्यांनी मला असा ताप्त काय की कसा माला पण
आईला असायचं व्हाय म्हणून मी गप्प होते व्हाय तर मला पण
शिव्या देता येतात. साधून सांगितलं. आगं त्याच शिव्या देण्यात
काही ठेवलं काय आज म्हणेल का - ते करताय तसं आपून करायचं
व्हाय माझं एक ऐक चील का. काय होयत ते सांग मी ऐकतो.
मग असं कर येत्या बाजारी आपल्या साऱ्याच कोंबड्या तेवढ्या
विकून टाकायची हो. मग बघू आंडा कसं लागतायत. आत पण
आंड्यासाठी कुणी कोंबड्या ठेवल्यात का आणि तुम्ही बोल
म्हणताय कोंबड्या विकून टाक. व्हय बाई मी एक कोंबडी

६

सुद्धा ऐकणार नव्हते. काय होतय ते मी पण बगत राहून एक
दिवस येऊन सांगितलं आता इथे येत्या बाजारी इकल्यावर की
पुढच्या बाजारी परत तुला तुझ्या कोंबड्या घेऊन देतो कारण
आपल्या लोकांच्या पण कोंबड्या होत्या म्हणून मला काही
बोलता येईना आपल्या कोंबड्या इकल्या की त्या दोघींची कशी
गंमत करतो ते कळेल नाही. चिंटूनं सांगितलं. की तुम्ही म्हणा
लोक तर तसं करतो तुम्हाला काय गंमत करायची ती करा राहू
देईन सांगितलं आणि त्या येणाऱ्या बाजारी सकाळीच सगळ्
बाई आपल्या सर्व कोंबड्या विकून मोकळी झाली व दुपारी
दिवस बाजार करून आली होती -- त्यांच्या दोन जावांना कोंबड्या
विकल्या बद्दल आनंद झाला होता - सर्वांना आनंद झाली होती
हे तिघे बाजार करून घरी आले होते. त्याच सर्व बाई व
दोघी बाईंना आपापल्या नवऱ्यांना सांगून कोंबड्या विकल्या
बद्दल सांगितलं परंतु त्या बद्दल त्यांनी काही विचार सुद्धा
केला नाही.



दि.14 जानेवारी 1987 रोजी पुण्याच्या विद्यार्थी प्रकाशनाने प्रकाशित केलेली शंकर भाऊ साठे यांची "लखू" ही कादंबरी. या "लखू" कादंबरीचा नायक "लखू" हा अद्याप हयात असून वाटेगांव शेजारील भाटवाडी ता.वाळवा, जि.सांगली येथे वास्तव्यास आहे. अभ्यासकाने या नायकाचे दि.12 मे 1999 रोजी घेतलेले छायाचित्र.

================================================

## मुलाखत

================================================

शंकर भाऊ साठे यांचे पुतणे व अण्णा भाऊ साठे यांचे चिरंजीव श्री.मधुकर अण्णा साठे यांची अभ्यासकाने घेतलेली मुलाखत.

**प्रश्न** :– शंकर भाऊंनी आपल्या साहित्य लेखनास सुरूवात केंव्हा केली ?

**मधुकर** – माझे वडील अण्णा भाऊ साठे यांचे शंकर भाऊ हे धाकटे भाऊ असल्याने शंकर भाऊंना आम्ही सर्वजण "बापू" म्हणत असे. बापूंनी अण्णांच्या मृत्यूनंतर म्हणजे सुमारे 1980 च्या दरम्यान साहित्यलेखनास सुरूवात केली.

**प्रश्न** – शंकर भाऊंना साहित्य लेखनाची प्रेरणा कोणाकडून व कशी मिळाली ?

**मधुकर** – अण्णा भाऊंच्याकडूनच शंकर भाऊंनी साहित्यलेखनाची प्रेरणा घेतली. 1968 साली अण्णा भाऊ मुंबईत खूप आजारी असताना अण्णांनी भेट म्हणून शंकर भाऊंना स्वतःचा एक पेन दिला. पुढे 18 जुलै 1969 रोजी अण्णांचे मुंबईत निधन झाले. अण्णा भाऊंच्या पश्चात अण्णा भाऊंच्या वाचक वर्गाकडून आणि काही समाजबांधव तसेच कार्यकर्ते यांच्याप्रमाणेच पुण्याचे खोपकर व साळवे या प्रकाशकांनीसुध्दा अण्णा भाऊंच्या जीवन चरित्रावर लिखाण करण्यासाठी शंकर भाऊंच्या मागे तगादा लावला. त्यातूनच "माझा भाऊ अण्णा भाऊ" या आत्मकथनात्मक चरित्रवजा पुस्तकांचा जन्म झाला. शंकर भाऊ या पुस्तकामुळे लेखक बनले आणि इथून पुढे ते अतिशय प्रतिकुल परिस्थितीतही आयुष्याच्या अखेरपर्यंत लिहित राहिले.

**प्रश्न** :– शंकर भाऊंच्या प्रकाशित, अप्रकाशित साहित्याबद्दल माहिती सांगा ?

**मधुकर** – शंकर भाऊंनी सर्वसाधारणपणे एकूण 16 सोळा पुस्तके लिहिली. पैकी "माझा भाऊ अण्णा भाऊ" हे त्यांचे पहिले साहित्यिक अपत्य होय. "माझा भाऊ अण्णा भाऊ" हे आत्मकथनात्मक चरित्रवजा पुस्तक वगळता पुढे त्यांनी कादंबऱ्याच भरपूर प्रमाणात लिहिल्या.

<u>प्रश्न</u> – शंकर भाऊंनी लिहिलेल्या या कादंबऱ्यांची नावे सांगा ?

<u>मधुकर</u> – "माझा भाऊ अण्णा भाऊ" या पुस्तकानंतर शंकर भाऊंनी "एकच काडतूस" या नावाची पहिली कादंबरी लिहून आपल्या कादंबरी लिखाणास सुरूवात केली. पुढे "सावळा", "घमांडी", "सूड", "बाजी", "हंबीरा", "लखू", "सुगंधा", "सगुणा", "बायडी", "काळा ओढा", "जग" अशा सुमारे बारा कादंबऱ्या लिहिल्या. या सर्व कादंबऱ्या प्रकाशित स्वरूपात आहेत. मात्र शंकर भाऊंच्या मृत्यूपूर्वीच्या काळातील त्यांनी लिहिलेल्या साधरणपणे तीन कादंबऱ्या मात्र अद्यापपर्यंत अप्रकाशितच आहेत.

<u>प्रश्न</u> – त्यांच्या अप्रकाशित असलेल्या त्यांच्याच हस्ताक्षरातील काही कागदपत्रे आपणाकडे उपलब्ध आहेत का ?

<u>मधुकर</u> – हो आहेत. "शामगांव" या नावाची एक कादंबरी शंकर भाऊ लिहित होते. त्या दरम्यानच त्यांचा मृत्यू झाला. त्या "शामगांव" या अप्रकाशित कादंबरीची काही पाने आजही जीर्णावस्थेत उपलब्ध आहेत.

<u>प्रश्न</u> – शंकर भाऊंच्या कादंबरी लेखनाची ठळक वैशिष्टये आपण काय सांगू शकाल ?

<u>मधुकर</u> – शंकर भाऊंच्या कादंबरी लेखनाचा महत्वाचा विशेष म्हणजे त्यांनी सुमारे विसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या कालखंडातील सातारा, सांगली, कोल्हापूर या परिसरात घडलेल्या सत्य घटनाप्रसंगावर आधारीत आपले कादंबरी लिखाण केले. शंकर भाऊंच्या कादंबऱ्यातील नायक हे चारित्र्यसंपन्न, धाडसी स्वभावाचे, करारी बाण्याचे, न्यायाची चाड आणि अन्यायाची चीड असणारे त्याचप्रमाणे स्वतःला व समाजाला जगविण्यासाठी वेळप्रसंगी वाट्टेल ते करणारे असे नायक आहेत. शंकर भाऊंच्या नायिका ह्या अतिसुंदर, कष्टाळू, जिद्दी आणि शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या अशा प्रकारच्या आहेत. शंकर भाऊंनी दलित आणि कष्टकरी कामगार यांच्या जीवनावर कादंबरी लिखाण केले आहे.

* शंकर भाऊ साठे यांचा नातू चि.सचिन याची अभ्यासकाने घेतलेली मुलाखत.

<u>प्रश्न</u> – सचिन, तुझी ओळख आणि माहिती थोडक्यात सांग ?

<u>सचिन</u> – माझे नाव – सचिन संजय साठे, मी इयत्ता 8 वी या वर्गामध्ये शिकत असून शंकर भाऊं हे माझे आजोबा आहेत. आजोबांच्या मृत्यूअगोदर 1993 साली माझ्या वडीलांचे निधन झाले आहे.

<u>प्रश्न</u> – सचिन, तुझे आजोबा शंकर भाऊ साठे यांच्या काही आठवणी सांग ?

<u>सचिन</u> – आमच्या घरातील सर्वांप्रमाणेच मी ही आजोबांना "बापू" म्हणत असे.

"बापू" हे कधी घरात बसून तर कधी–कधी आमच्या घरासमोरच्या सिताफळाच्या झाडाखाली बसून लिहित असत.